नाशिक
दि. १०/१२/२०२०

# प्रेसनोट

## आलोसे बाळासाहेब दामोदर सोनवणे, पोलीस हवालदार/१४५०, नेमणुक उपनगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर यांना १०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांची कारवाई.

| | |
|---|---|
| घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | उपनगर पो.स्टे.,नाशिक शहर, गु.र.नं. ५७७/२०२० |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८(संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | बाळासाहेब दामोदर सोनवणे, पोलीस हवालदार/१४५०, नेमणुक उपनगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | १०,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांच्या पत्नीने तक्रारदार व त्यांचे कुटूंबीयांविरोधात फिर्याद दिल्याने उपनगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर गु.र.नं. ३३५/२०२० भादवि.क.४९८(अ), ३२३,५०४,५०६ अन्वये गुन्हा दाखल केला असुन आलोसे बाळासाहेब दामोदर सोनवणे, पोलीस हवालदार/१४५०, नेमणुक उपनगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर यांनी नमुद दाखल गुन्हयात तक्रारदार व त्याचे नातेवाईकांना तपासात मदत करुन जामीन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडून १०,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे बाळासाहेब दामोदर सोनवणे, पोलीस हवालदार/१४५०, नेमणुक उपनगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर यांनी दाखल गुन्हयात तक्रारदार व त्याचे नातेवाईकांना तपासात मदत करुन जामीन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडून १०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष दि.९/१२/२०२० रोजी स्विकारली असता त्यांना पकडण्यात आल्याने त्यांचेविरुध्द उपनगर पो.स्टे.,नाशिक शहर, गु.र.नं.५७७/२०२० भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे (संशोधन सन—२०१८) चे कलम ७ प्रमाणे. दि. १०/१२/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/अॅप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस अॅप क्र. : ९९३०९९७७००

10-12-2020
( दिनकर पिंगळे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता